महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103

E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/138/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2025 दिनांक : 08/04/2025

---

## खुनाच्या गुन्हयातील दोन पाहिजे आरोपीना नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथक व चार्ली पथक यांनी केले जेरबंद तसेच गुन्हेगारीस आळा घालण्यात आले यश

**मा. श्री अबिनाश कुमार साो**, पोलीस अधीक्षक नांदेड, यांच्या संकल्पनेतुन स्थापन करण्यात आलेल्या “**नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी पथक**” यांनी 1) बारड पो.स्टे गु.र.नं.107/2024 कलम 303 (1),3(5) भारतीय न्याय संहिता या गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे संतोष लक्ष्मण करनेवाड वय 33 वर्षे रा. मेहबुब नगर लगत, वसंतनगर, नांदेड तसेच 2) चार्ली पथक यांनी तामसा पो.स्टे. गु.र.न. 44/2022 कलम 302,504,506,34 या गुन्हयातील आरोपी नामे शिवाजी गणपत गायकवाड, वय 45 वर्षे हे दोन्ही आरोपी गुन्हा केल्यानंतर अनेक दिवसापासून परागंदा झालेले होते. सदर आरोपींबाबत पथकातील अधिकारी सपोनि श्री. संकेत दिघे, पोउपनिरी श्री. खंडु दर्शने तसेच पोलीस अमलदार पोकॉ 2458 पांगरेकर, पोकॉ 509 वाघमारे, पोकॉ 1556 अमलापुरे, पोकॉ 195 अटाळकर यांनी त्यांचे ठावठिकाण्याबाबत गोपनीय माहिती काढुन त्यांना जेरबंद करून पुढील कारवाईकामी संबंधीत पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हददीत पिडीत मुलगा नामे रोनक कचरूलाल बजाज, वय 18 वर्षे, यांस चाकुने मारहाण करीत असलेबाबत माहिती मिळताच पोउपनिरी खंडु दर्शने व सपोउपनिरी जोशी, पोकॉ 2545 फुलारी यांनी तात्काळ घटनास्थळावर जावुन जखमी इसमास वैदयकीय उपचारासाठी पाठवुन त्याचे प्राण वाचविले. हल्लेखोर शुभम कचरुलाल बजाज यांस भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले.

तसेच सदर **स्ट्रिट सेफ्टी** पथकाने नांदेड शहरामध्ये रोडवर खुलेआम दारू विक्रीचे साहीत्य उपलब्ध करून देणारे **एकुण 33 इसमावंर** शहरातील विविध पोलीस स्टेशन मध्ये दारूबंदी कायदयान्वये **एकुण 12** गुन्हे दाखल केलेले आहेत. छत्रपती चौक येथे एका इसमाकडे खंजर असल्याबाबत माहिती मिळताच पथकातील अंमलदार पोकॉ 1225 हणमंते यांनी तात्काळ सदर ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेवर भाग्यनगर पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदयाप्रमाणे कारवाई केलेली आहे. तसेच चार्ली पथकातील पोकॉ 1556 अमलापुरे, पोकॉ 1202 सोरडगे, पोकॉ 1796 हाके, पोकॉ 195 अटाळकर, यांनी शहरामध्ये हत्यारे घेवुन फिरणारे एकुण 3 इसमांना ताब्यात घेवुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केलेले आहेत.

शहरामध्ये सदर **"स्ट्रिट सेफ्टी पथकाने"** महापुरूषांचे जयंती व सणानिमीत्ताने मोटार सायकलचे सायलेंन्सर काढुन, व बुलेट गाडीचा फटाक्यासारखा आवाज करून सार्वजनिक ठिकाणी कर्कश आवाज करून **ध्वनीप्रदुषन करणारे एकुण 32 मोटारसायकलींवर** कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालुन सार्वजनिक शांतता भंग करणारे **157 इसमांवर** मपोका कलम **110–117** प्रमाणे शहरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

शहरामध्ये शाळा, कॉलेजेस व टयुशन एरीयामध्ये विदयार्थीचे सुरक्षितते अनुषंगाने वजिराबाद व दामिनी पथकाचे मपोउपनिरी श्रीमती देशमुख व श्रीमती जाधव यांचे पथकाने सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणारे एकुण **40 इसमांवर मपोका कलम 110–117** प्रमाणे, मोटार वाहन कायदा प्रमाणे **17 मोटारसायकल, कोप्टा ॲक्टप्रमाणे 05** कारवाया करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्ट्रिट पथकातील ग्रामीण पोलीस स्टेशनचे चार्ली पोलीस अंमलदार/कोठाळे सोबत सोनकांबळे यांनी दिनांक 31 जानेवारी 2025 रोजी न्यायनगर कौठा, नांदेड येथे हायवा आणि मोटार सायकलचे झालेल्या अपघातातील जखमीस तात्काळ ॲम्बुलन्स बोलावून उपचार करणे कामी रूग्णालयात रवाना करून जखमीचा जिव वाचविला. तसेच दिनांक 21 मार्च 2025 रोजी इतवारा चार्ली सपोनि/तमशेटे, पोलीस अंमलदार/ पल्लेवाड यांनी जुना मोंढा, नांदेड येथील ब्रिजवरून उडी मारून आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या इसमास तात्काळ ताब्यात घेवून इतवारा पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचे पत्नीस बोलावून घेवून त्याचे मनपरिवर्तन करून पत्नीचे ताब्यात देवून त्याचा जिव वाचविला.

मा. पोलीस अधिक्षक सा़ो यांचे मार्गदर्शनाखाली **"नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी पथक"** व **चार्ली पथक, दामिनी पथक** यांनी सार्वजनिक ठिकाणी, रोडवर बंदोबस्त वाढल्याने गुन्हेगारांना गुन्हा करून पोलीसांचे नजरेतुन पळून जाणे अवघड झालेले आहे. परीणामी गेल्यावर्षीच्या तुलनेमध्ये **जबरी चोरीच्या गुन्हयांमध्ये 08, घरफोडीच्या गुन्हयांमध्ये 16, मोटारसायकल चोरीच्या गुन्हयांमध्ये 28** ने घट झााल्याचे पाहावयास मिळत आहे. नांदेड पोलीस दलाचे वतीने राबविण्यात आलेल्या पथकामुळे नागरीकांमध्ये अधिक सुरक्षिततेतीची भावना निर्माण झाल्याचे दिसुन येत असुन नागरीकांमधुन समाधान व्यक्त केले जात आहे.

नांदेड पोलीस दलाचे वतीने नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणारे, फटाका बुलेट, बिना सायलेन्सर कर्कश आवाज करणारे मोटारसायकल, तसेच सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्याचे साहीत्य उपलब्ध करून देणारे यांचेविषयी काहीही माहिती असल्यास सदरची माहिती मा. श्री. **अबिनाश कुमार** पोलीस अधिक्षक, मो.नं. 8802007938, श्री. बसवराज तमशेटे मो.नं. 7588525602, श्री. खंडू दर्शने मो.नं. 9158328841, श्री. विश्वदीप रोड, मो.नं. 9158807759 यांना फोन करून दयावी. माहिती देण्याऱ्याचे नाव गुप्त ठेवून अशा इसमांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड